# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं. 178/2024  दिनांक : 21.05.2024

## 1)घरफोडी :–

**विमानतळ :–** दिनांक 20.05.2024 रोजी 02.00 वा. ते 06.50 वा. चे दरम्यान, **आनंदनगर प्लॉट नं. 68, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे मालकीचे बांधकामाचे ठिकाणावरून पांढरे रंगाचे पोत्यातील फिनोलेक्स कंपनीचे वायरचे 08 बंडल एकुण किंमती 57,500/–रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शिक्रपा उर्फ बाबाराव पि. पिराजी शिवशेट्टे, वय 42 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. श्रीरामनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 161/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2166 राठोड, मो. नं. 9823357541** हे करीत आहेत.

## 2)मो.सा.चोरी :–

**किनवट :–** दिनांक 18.05.2024 रोजी 23.00 वा. ते दिनांक 19.05.2024 रोजी 07.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोरून एस.व्ही.एम. कॉलनी किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पल्सर कंपनीची मोटार सायकल क्रं. एम.एच.–29/बीडब्ल्यु–7183 किंमती 65,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी आकाश चंदु जाधव, वय 24 वर्षे, व्यवसाय बजाज फायनान्स मॅनेजर रा. एस.व्ही.एम. कॉलनी किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 124/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/772 पाटोदे, मो.क्रं. 8329789772** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 14.05.2024 रोजी 05.30 वा. ते 06.15 वा. चे दरम्यान, **गुरूपवार यांचे घरी विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा लघुशंका करून येवुन दरवाजा पुढे ढकलुन झोपी गेला असता त्यांचा काळया रंगाचा वन प्लस कंपनिचा मोबाईल किंमती 44,999/– रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शिवम पि. शिवदास जबडे, वय 21 वर्षे, व्यवसाय गुरूपवार यांचे घरी विष्णुपुरी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 400/2024 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1271 सातारे, मो.क्रं. 9823024794** हे करीत आहेत.

**2)किनवट :–** दिनांक 15.05.2024 रोजी 22.00 वा. ते दिनांक 20.05.2024 रोजी 09.00 वा. चे दरम्यान, **मार्कंडेश्वर मंदिर किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने त्यांचे अशोक लेलॅड मालवाहक वाहन क्रं. एम.एच.–26/बीई–6653 हे भावाच्या घरासमोर लावुन बाहेरगावी गेले असता सदर वाहनाचे सायलेन्सर किंमती 30,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सुनिल भारत मुरगुलवार, वय 35 वर्षे, व्यवसाय मार्कंडेश्वर मंदिर किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 123/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 वाडगुरे, मो.क्रं. 8805981062** हे करीत आहेत.

## 4)अवैध रेती चोरी :–

**किनवट :–**दिनांक 01.03.2024 रोजी 11.00 वा. दिनांक 03.04.2024 रोजी 11.00 वा. चे दरम्यान, **आरोपीचे शेतात शेत सर्वे नंबर 33 मध्ये मालेगाव ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे शेतात जप्त केलेली 160 ब्रास रेती पैकी अंदाजे 150 ब्रास रेती किंमती 7,50,000/–रूपयाची चोरून नेली. वगैरे **फिर्यादी देविदास रूकमाजी कांबळे, वय 40 वर्षे व्यवसाय मंडळ अधिकारी सिंदगी मोहपुर रा. गोरठा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 125/2024 कलम 379 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 वाडगुरे, मो. क्रं. 8805981062** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**हिमायतनगर :–**दिनांक 16.05.2024 रोजी 22.15 वा. चे सुमारास, **हिमायतनगर ते शिरंजनी जाणारे रोडवर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीची मोटार सायकल आडवुन फिर्यादीस तू आमच्या विरोधात पेपर ला बातम्या का देतो असे म्हणुन शिवीगाळ करू लागले तेव्हा फिर्यादीने आरोपितांना तुमच्या बातम्या कोणी लावल्या आहेत म्हणताच फिर्यादीस आरोपीतांनी लोखंडी रॉडने डाव्या हाताच्या मनगटावर, उजव्या पायाच्या टोंगळयावर मारून गंभीर जखमी केले व आमच्या बाबत पेपरला बातम्या दिल्यातर खतम करतो अशी धमकी दिली. वगैरे **फिर्यादी धम्मपाल माधव मुन्नेश्वर, वय 33 वर्षे, व्यवसाय पत्रकार रा. सिरंजनी ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 110/2024 कलम 326,341,324,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मसपोउपनि/श्रीमती कांगणे, मो. नं. 99216233333** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 20.05.2024 रोजी 02.45 वा. चे सुमारास, **गणेशनगर येथील गणपती मंदिराच्या भिंतीलगत नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 8550/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2753 शेख लियाकत शेख जैनोदिन, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 171/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/182 ढवळे, मो.नं. 9823093182** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 20.05.2024 रोजी 00.40 वा. चे सुमारास, **रामनगर येथील स्मशानभूमीचे बाजूला नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 3400/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/724 महेश रमेशराव माकूलवार, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 124/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2006 मुस्तापुरे, मो.नं. 9325850996** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 179 ⁄ 2024 दिनांक : 21.05.2024

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस प्रतिज्ञा"** घेण्यास आली

21 मे, 2024 मंगळवार रोजी **"दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस प्रतिज्ञा"** पोलीस अधिक्षक कार्यालयात घेण्यात आली, **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांनी प्रतिज्ञाचे वाचन केले. त्या पाठोपाठ उपस्थित सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी यांनी सदर प्रतिज्ञाचे सामुहीक वाचन केले. या प्रसंगी **श्री उदय खंडेराय,** पोनि स्थागुशा, **मा. श्री. श्यामसुंदर टाक,** पोनि जिवीशा, **श्री नामदेव रिठ्ठे,** पोनि पोलीस कल्याण शाखा, **श्री गंगाधर गायकवाड,** सपोनि दहशदवाद विरोधी सेल तसेच इतर शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर प्रतिज्ञा वाचनचे आयोजन सपोउपनि सुर्यभान कागणे, पोहेकॉ संजय सांगवीकर, पोकॉ मारोती कांबळे जनसंपर्क कार्यालय पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड यांनी केले.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


OPPO Reno5 Pro 5G